**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुसूदन परशुराम लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.मधुसूदन परशुराम लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.विश्वास गोडबोले यांनी बांधकाम परवानगी घेतली आहे काय, असल्यास प्रत. नसल्यास सदर बांधकाम काढून टाकण्याबाबत बांधकाम नियंत्रण खात्याकडून केलेल्या कारवाईच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती. | |

## विवेचन

श्री.विश्वास य. गोडबोले यांनी पार्किंगच्या जागेचा व्यापारी वापर चालविला असून त्याला पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण विभागाने परवानगी दिली असल्याबाबतची माहिती व बेकायदेशीर बांधकामाबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपीलकर्ता श्री.लिमये यांनी मागितली होती. आपल्या तक्रारीची दखल घेऊन परवानगीचे काम थांबविण्यात आले आहे. संबंधित परवानगीबाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यास कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात हे बांधकाम तात्पुरत्या स्वरुपाचे असून कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ते काढून घेण्यात येणार असल्याचे मालक / आर्किटेक्ट यांनी स्पष्ट केले आहे. याबाबतच्या प्रकरणाची आपण माहितीच्या अधिकारात वेळावेळी समक्ष पाहणी केली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी श्री.लिमये यांना विहित मुदतीत कळविले. तसेच विषयांकित प्रकरणाची फाईल पाहण्यासाठी उपलब्ध असून आपल्याला हवी असलेली कागदपत्रे विहित शुल्क भरल्यानंतर देण्यात येतील, असेही या उत्तरात जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. दिलेली माहिती मूळ मुद्दयांशी संबंधित नसून असंबध्द व चुकीची आहे, असे निवेदन श्री.लिमये यांनी अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांना पाठविले. बांधकाम बेकायदेशीर असल्याची व त्याबाबत आवश्यक ती कारवाई होत नसल्याची तक्रार या निवेदनात केली आहे. 'संबंधित परवानगीबाबतचे कागदपत्रांची पूर्तता करण्यास काही कालावधी लागत आहे.' हे आणखी एक हास्यास्पद व निर्लज्जपणाचे विधान आहे. आपल्या

खात्याने तीन दिवसांत कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय नकाशा मंजूर करावयाचा व नंतर त्याच्या पूर्ततेसाठी काही कालावधी लागत आहे, असे समर्थन करावयाचे, असा अजब न्याय आपले खात्यांत आहे. आज १० महिन्यानंतरही सदर कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही. या कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर बेकायदेशीर बांधकाम कायदेशीर होणार आहे काय, असल्यास तसे स्पष्टपणे उत्तरात का लिहिले नाही, या कागदपत्रांचा व बेकायदेशीर बांधकामाचा व व्यापारी वापराचा संबंध माझे समजण्याचे पलीकडचा आहे, आपण कृपया याबाबत खुलासा केल्यास मी आपला आभारी होईन. ह्यावरुन संबंधित नकाशे कसे पास झाले असतील, याची कल्पना आपणास येईल,' अशा स्वरुपाची विधाने श्री.लिमये यांनी या निवेदनात केली आहेत.

संबंधित प्रकरणामध्ये बांधकाम करण्यास श्री.गोडबोले यांनी कोणतीही परवानगी मागितलेली नाही व तशा प्रकारची परवानगी दिलेली नाही, असे सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग श्री.सुकुमार पाटील यांनी सांगितल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांच्या आदेशात नमूद केले आहे. त्याविरुध्द श्री.लिमये यांनी राज्य माहिती आयागाकडे अपील केले आहे.

परवानगी नसताना पार्किंगमध्ये बांधकाम केले आहे व त्याचा व्यापारी तत्त्वावर वापर चालू आहे, हे तेथे लावलेल्या वाचनालयाच्या फलकावरुन स्पष्ट होते. दि.२०.१२.२००६ ला अर्ज दिला, जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.१.२००७ रोजी उत्तर दिले. त्यानंतर बेकायदेशीर बांधकाम करण्यात आले व मे २००७ मध्ये ते नियमित करण्यात आल्याचे आपल्याला तोंडी सांगण्यात आले, असे प्रतिपादन श्री.लिमये यांनी केले. मात्र बांधकाम परवानगी हंगामी स्वरुपाची विहित नमुन्यामध्ये मागणी केलेली नव्हती व हंगामी परवानगी दिलेली नव्हती. त्यामुळे परवानगीबाबतची कागदपत्रे अस्तित्त्वातच नसल्यामुळे देण्याचा प्रश्न येत नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर पुन्हा एकदा श्री.लिमये यांना कळविले. गावठाणातील मिळकत असल्याने नंतर परवानगी देण्यात आली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे यांनी सांगितले.

श्री.लिमये यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे, मात्र बांधकाम बेकायदेशीर असल्याची त्यांची तक्रार व त्या अनुषंगाने कारवाई हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. तसेच पूर्णत: वैयक्तिक स्वरुपाचा असा हा विषय आहे. श्री.लिमये हे पत्रव्यवहारात अशिष्ट भाषा वापरत असल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. 'नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे अपिलीय प्राधिकारी म्हणून नेहमीच तपशीलवार कारणमीमांसा न करता फक्त दोन ओळीचा आदेश देतात व कोणत्याही दोषी व्यक्तीबाबत कारवाई करीत नाहीत,' असे श्री.लिमये यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. विविध अपिलांमधील श्री.वाघमारे यांचे आदेश पाहता, अपिलीय प्राधिकारी म्हणून दोषी व्यक्तीवर कारवाई करण्याचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांना अधिकार नसला तरी, त्रोटकपणा व दोषी व्यक्तींबाबतच्या स्पष्ट उल्लेखाचा अभाव त्यांच्या आदेशात दिसून येतो. यात सुधारणा होण्याची गरज असल्याची जाणीव त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९२३ / सांगली | श्री.चंद्रशेखर पुरुषोत्तमदास शेठ २५, न्यू टिंबर एरिया, सांगली | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, जि.सांगली | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या., कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली | श्री.श्रीकांत गोविंददास शेडजी यांनी विद्युत कंपनीकडे दि. २२.९.०८ व दि. ६.११.०८ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भातील विविध माहिती. | आवश्यक माहिती १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९२४ / सांगली | श्री.चंद्रशेखर पुरुषोत्तमदास शेठ २५, न्यू टिंबर एरिया, सांगली | सांगली शहर मध्य उपविभाग व सामान्य प्रशासन विभाग, मंडल कार्यालय, सांगली | अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लि., सांगली | बेकायदेशीर वीज जोडणी संदर्भात माहिती १ ते ९ मुद्दे | आवश्यक ती माहिती १५ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. बिलातील नावातील दुरुस्ती करुन देणे ही बाब माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | ९४८ / सांगली | श्री.श्रीकांत सदाशिव कात्रे अण्णसाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि.सांगली | कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सन २००३ ते २००८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या अधिनस्त इंजिनिअरिं कॉलेज मध्ये नियुक्त प्राध्यापक व सहायक प्राध्यापकांबाबत माहिती | माहितीबद्दल तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ९५६ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | मालमत्ता अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिका कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर माहिती | आवश्यक माहिती आठ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ९५७ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | शहर अभियंता, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | जुना बुधगाव रोड इदगाह मैदानाबाजूच्या रस्त्याच्या बांधकामासंदर्भात माहिती. | आवश्यक माहिती आठ दिवसात देण्याचे माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ९५९ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिका कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर माहिती | आवश्यक माहिती आठ दिवसाम देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ६ (क्र. ९२३, ९२४, ९४८, ९५६, ९५७ व ९५९ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २४-०४-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९२३ / सांगली | श्री.चंद्रशेखर पुरुषोत्तमदास शेठ २५, न्यू टिंबर एरिया, सांगली | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, जि.सांगली | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या., कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली | श्री.श्रीकांत गोविंददास शेडजी यांनी विद्युत कंपनीकडे दि. २२.९.०८ व दि. ६.११.०८ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भातील विविध माहिती. | आवश्यक माहिती १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९२४ / सांगली | श्री.चंद्रशेखर पुरुषोत्तमदास शेठ २५, न्यू टिंबर एरिया, सांगली | सांगली शहर मध्य उपविभाग व सामान्य प्रशासन विभाग, मंडल कार्यालय, सांगली | अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लि., सांगली | बेकायदेशीर वीज जोडणी संदर्भात माहिती १ ते ९ मुद्दे | आवश्यक ती माहिती १५ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. बिलातील नावातील दुरुस्ती करुन देणे ही बाब माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | ९४८ / सांगली | श्री.श्रीकांत सदाशिव कात्रे अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि.सांगली | कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सन २००३ ते २००८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या अधिनस्त इंजिनिअरिं कॉलेज मध्ये नियुक्त प्राध्यापक व सहायक प्राध्यापकांबाबत माहिती | माहितीबद्दल तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ९५६ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | मालमत्ता अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिका कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर माहिती | आवश्यक माहिती आठ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ९५७ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | शहर अभियंता, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | जुना बुधगाव रोड इदगाह मैदानाबाजूच्या रस्त्याच्या बांधकामासंदर्भात माहिती. | आवश्यक माहिती आठ दिवसात देण्याचे माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ९५९ / सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिका कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर माहिती | आवश्यक माहिती आठ दिवसाम देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ६ (क्र. ९२३, ९२४, ९४८, ९५६, ९५७ व ९५९ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४-०४-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००८ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९२८ / सांगली | श्री. बाबूराव ज्ञानू मिरजकर मु.पो.करंजवडे, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्राम पंचायत करंजवडे, ता.वाळवा, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी वर्ग १, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | आ.सी.सी.घरे किती त्यासंदर्भात ग्रामपंचायतीचे उत्पन्नाची माहिती. | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९४४ / सांगली | श्री.सुधीर अच्युतराव देशमुख मु.पो.ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, मार्केट सिटी बिल्डींग, आटपाडी, जि.सांगली | उपविभागीय कृषि अधिकारी, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | आटपाडी तालुक्यातील शेतकरी स्कीम राबविलेबाबत तपशील | अपीलकर्त्यास दि. १८.५.०९ पर्यंत माहिती देण्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ९४६ / सांगली | श्री.सदाशिव बाळ वावरे मु.पो.भिलवडी, (माळवाडी), ता.पलूस, जि.सांगली | वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, तासगाव, जि.सांगली | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे १ | सेवानिर्वृत्तिचा प्रस्ताव व मंजुरी संदर्भातील पत्रव्यवहाराची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ९६२ / सांगली | श्री.जगन्नाथ दादू पेंडे शाहूनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | मुख्याध्यापिका, सदाशिवराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विटा नं. १६, जि.सांगली | प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | सन २००७ - २००८ च्या दुस-या सत्र परिक्षेच्या ५ ते ७ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या उत्तर पत्रिकाच्या पहिल्या पृष्ठाची झेरॉक्स व इतर १० मुद्दे | निकाली काढण्याबाबत एकमत अपुरी व नजर चुकीची दुरुस्ती करुन माहिती दि. २८.४.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (क्र. ९२८, ९४४, ९४६ व ९६२ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २१-०४-२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००८ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९२८ / सांगली | श्री. बाबूराव ज्ञानू मिरजकर मु.पो.करंजवडे, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्राम पंचायत करंजवडे, ता.वाळवा. जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी वर्ग १, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | आ.सी.सी.घरे किती त्यासंदर्भात ग्रामपंचायतीचे उत्पन्नाची माहिती. | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९४४ / सांगली | श्री.सुधीर अच्युतराव देशमुख मु.पो.ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, मार्केट सिटी बिल्डींग, आटपाडी, जि.सांगली | उपविभागीय कृषि अधिकारी, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | आटपाडी तालुक्यातील शेतकरी स्कीम राबविलेबाबत तपशील | अपीलकर्त्यास दि. १८.५.०९ पर्यंत माहिती देण्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ९४६ / सांगली | श्री.सदाशिव बाळ वावरे मु.पो.भिलवडी, (माळवाडी), ता.पलूस, जि.सांगली | वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, तासगाव, जि.सांगली | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे १ | सेवानिवृत्तीचा प्रस्ताव व मंजुरी संदर्भातील पत्रव्यवहाराची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ९६२ / सांगली | श्री.जगन्नाथ दादू पेंडे शाहूनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | मुख्याध्यापिका, सदाशिवराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विटा नं. १६, जि.सांगली | प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | सन २००७ - २००८ च्या दुस-या सत्र परिक्षेच्या ५ ते ७ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या उत्तर पत्रिकाच्या पहिल्या पृष्ठाची झेरॉक्स व इतर १० मुद्दे | निकाली काढण्याबाबत एकमत अपुरी व नजर चुकीची दुरुस्ती करत माहिती दि. २८.४.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (क्र. ९२८, ९४४, ९४६ व ९६२ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०४-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००८ रोजी पुणे / सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९२८ / सांगली | श्री. बाबूराव ज्ञानू मिरजकर मु.पो.करंजवडे, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्राम पंचायत करंजवडे, ता.वाळवा, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी वर्ग १, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | आ.सी.सी.घरे किती त्यासंदर्भात ग्रामपंचायतीचे उत्पन्नाची माहिती. | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९४४ / सांगली | श्री.सुधीर अच्युतराव देशमुख मु.पो.ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, मार्केट सिटी बिल्डींग, आटपाडी, जि.सांगली | उपविभागीय कृषि अधिकारी, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | आटपाडी तालुक्यातील शेतकरी स्कीम राबविलेबाबत तपशील | अपीलकर्त्यास दि. १८.५.०९ पर्यंत माहिती देण्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ९४६ / सांगली | श्री.सदाशिव बाळ वावरे मु.पो.भिलवडी, (माळवाडी), ता.पलूस, जि.सांगली | वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, तासगाव, जि.सांगली | उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे १ | सेवानिर्वृत्तिचा प्रस्ताव व मंजुरी संदर्भातील पत्रव्यवहाराची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ९६२ / सांगली | श्री.जगन्नाथ दादू पेंडे शाहूनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | मुख्याध्यापिका, सदाशिवराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विटा नं. १६, जि.सांगली | प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, विटा, ता.खानापूर, जि.सांगली | सन २००७ - २००८ च्या दुस-या सत्र परिक्षेच्या ५ ते ७ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या उत्तर पत्रिकाच्या पहिल्या पृष्ठाची झेरॉक्स व इतर १० मुद्दे | निकाली काढण्याबाबत एकमत अपुरी व नजर चुकीची दुरुस्ती करुन माहिती दि. २८.४.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (क्र. ९२८, ९४४, ९४६ व ९६२ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०४-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-०४-२००९ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री.पोपट विष्णू राजमाने, मु.पो.नागज, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|
| १ | ९५३ / सांगली | प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय, गिरवी, ता.फलटण, जि.सातारा | सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर | कृषि विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मधील अंतिम प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेश यादी व प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची यादी. |

अपीलकर्ता श्री.पोपट विष्णू राजमाने यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, गिरवी, ता. फलटण, जि.सातारा यांच्याकडून माहिती मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे. कार्यालयाच्या स्थलांतरात श्री.पो.वि.राजमाने यांचा माहिती मागणी अर्ज गहाळ झाल्यामुळे व अर्जावरील अर्जदाराचा पत्ता न मिळाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे, तसेच सदर माहिती अपीलकर्त्यास नि:शुल्क पाठविल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी कु.दिपाली शशिकांत शिंदे, प्राचार्य कृषि तंत्र विद्यालय, गिरवी यांनी दि. १६.४.२००९ रोजी झालेल्या ' विशेंष अपील निर्गत ' कार्यक्रमाच्या प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, गिरवी यांनी माहिती विलंबाने दिल्याबाबत त्यांना अपिलीय प्राधिकारी तथा सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर यांनी समज दिल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांचा खुलासा मान्य करुन शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, गिरवी, कु.दिपाली श. शिंदे यांनी विलंबाबाबतच्या परिस्थितीची कल्पना अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते, त्याबाबत कु.शिंदे यांना ताकिद देण्यात येत आहे.

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७-०४-२००९**